# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 13 July 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १३ जुलै २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- युवकांचं सामर्थ्य हीच भारताच्या उज्ज्वल भवितव्याची हमी – १६ व्या रोजगार मेळाव्यात पंतप्रधानांचं प्रतिपादन
- राज्यात मुंबई, नागपूर, तसंच पुण्यातल्या मेळाव्यात मान्यवरांच्या हस्ते तरुणांना नियुक्तीपत्रं प्रदान
- आषाढी वारीच्या माध्यमातून एसटी महामंडळाला ३५ कोटी ८७ लाखाहून अधिक उत्पन्न
- छत्रपती संभाजीनगर शासकीय कर्करोग रुग्णालयात डिजिटल मॅमोग्राफी यंत्र आणि स्तन कर्करोग तपासणी शिबीर

आणि

- लॉर्ड्स कसोटीत पहिला डाव बरोबरीत; तर विम्बलडन टेनिस स्पर्धेत पोलंडच्या इगा श्वियांतेकला महिला एकेरीचं अजिंक्यपद

****

युवकांचं सामर्थ्य हीच भारताच्या उज्ज्वल भवितव्याची हमी असल्याचं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. देशातल्या ४७ शहरांमध्ये काल रोजगार मेळावे घेण्यात आले, या मेळाव्यांना दूरदृष्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून पंतप्रधानांनी संबोधित केलं, तसंच देशभरात ५१ हजार युवक युवतींना नियुक्तीपत्रं प्रदान करून शुभेच्छा दिल्या. या मेळाव्यांच्या माध्यमातून युवकांना सक्षम करण्यातून, विकसित भारताच्या निर्माणाप्रती केंद्र सरकारची कटिबद्धता अधोरेखित होत असल्याचं ते म्हणाले. भारताची लोकशाही आणि लोकसंख्या ही ताकद आज जगासमोर आदर्श असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. ते म्हणाले…

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

**

राज्यात रेल्वे विभागाने मुंबई, नागपूर तसंच पुण्यात रोजगार मेळावे घेतले.

मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या प्रमुख उपस्थितीत रोजगार मेळावा घेण्यात आला. यावेळी कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा आणि मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. `हा दिवस फक्त नोकरी मिळण्याचा नाही, तर देशाच्या विकासात योगदानाची सुवर्णसंधी देणारा असल्याचं गोयल यावेळी म्हणाले.

**

नागपूर इथं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते १४९ उमेदवारांना नियुक्ती पत्राचं वाटप करण्यात आलं. शासकीय नोकरी ही चांगली समाजसेवा आणि देश सेवा करण्याची संधी समजून कर्तव्य पार पाडावं आणि यशस्वी व्हावं, असं आवाहन त्यांनी यावेळी नवनियुक्तांना केलं.

**

पुण्यात कोरेगाव पार्क इथं झालेल्या रोजगार मेळाव्यात नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते दोनशे युवक युवतींना नियुक्तीपत्रांचं वाटप करण्यात आलं.

****

छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ गडकिल्ल्यांना युनेस्को- जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान मिळाल्याबद्दल सर्वत्र आनंद व्यक्त होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या निर्णयाबद्दल आनंद व्यक्त केला आहे. मराठा साम्राज्याची ओळख सुशासन, समाजकल्याण, लष्करी सामर्थ्य आणि सांस्कृतिक अभिमानाशी निगडित असल्याचं पंतप्रधानांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

यानिमित्त मुंबईत दादरच्या शिवाजी पार्कमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आलं. यावेळी केंद्रीय मंत्री पियूष गोयल, माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

साताऱ्यात पोवई नाका इथं छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आलं. भगव्या पताकांनी सजवलेल्या पोवई नाका इथं यावेळी महाराजांचा जयजयकार, पोवाडे तसंच साहसी खेळांचं सादरीकरण करण्यात आलं.

****

आषाढी यात्रेनिमित्त यंदा पाच हजार २०० जादा बसगाड्यांच्या माध्यमातून एसटीने साडे एकवीस हजार फेऱ्यांद्वारे तब्बल नऊ लाख ७१ हजार ६८३ भाविक - प्रवाशांची सुरक्षित ने-आण केली. या सेवेतून एसटीला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार रुपयांचं उत्पन्न मिळाल्याची माहिती परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. महामंडळानं गेल्या वर्षीपेक्षा यंदा सहा कोटी ९६ लाख तीन हजार रुपये जास्त उत्पन्न मिळवलं. चांगलं उत्पन्न आणून लाखो भाविकांना सुखरुप देवदर्शन घडवून आणणारे हजारो चालक, वाहक, यांत्रिकी कर्मचारी, पर्यवेक्षक आणि अधिकाऱ्यांचं सरनाईक यांनी अभिनंदन केलं.

****

कर्करोग रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला योग्य उपचार आणि दिलासादायक वागणूक मिळावी यासाठी रुग्णालयातल्या प्रत्येक डॉक्टर, कर्मचाऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असं आवाहन सामाजिक न्याय विभाग मंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी केलं आहे. शासकीय कर्करोग रुग्णालयात डिजिटल मॅमोग्राफी यंत्र आणि स्तन कर्करोग तपासणी शिबिराचं उद्घाटन केल्यानंतर ते काल बोलत होते. येत्या मंगळवारपर्यंत हे शिबीर चालणार आहे.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर शहरात सुरु असलेल्या अतिक्रमण निर्मूलन मोहिमेचा पालकमंत्री शिरसाट यांनी काल आढावा घेतला. शहर विकास आराखड्याप्रमाणे उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही अंमलबजावणी होत असून, ज्यांच्याकडे बांधकाम परवानगी आहे त्यांचं बांधकाम पाडण्यात येणार नाही. मात्र त्यांचं चिन्हांकन होऊन त्यांना त्यांचं म्हणणं मांडण्याची संधी दिली जाईल, असं महानगरपालिका आयुक्त जी. श्रीकांत यांनी सांगितलं.

****

परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयात काल आरोग्य राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते हिमोफेलीया रुग्णांसाठीच्या "हेमलिब्रा इंजेक्शन"चं लोकार्पण करण्यात आलं. परभणी जिल्ह्यात या आजाराचे एकूण ४८ रुग्ण आहेत. यासंदर्भात अधिक माहिती आमच्या प्रतिनिधींकडून...

**बाईट – सुदर्शन चापके, पीटीसी परभणी**

****

धाराशिवच्या जिल्हा शासकीय रुग्णालयासाठी एशियन विकास बँकेकडून ३२९ कोटी रुपयांचं कर्ज घेऊन, या रुग्णालयाचं काम आता सुरु होत असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यांनी दिली आहे. ते काल धाराशिव इथं वार्ताहरांशी बोलत होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि वैद्यकीय शिक्षण संकुल उभारणं प्रस्तावित असून, आगामी काळात त्या दृष्टीने प्रयत्न सुरु असल्याचं ते म्हणाले.

****

पंतप्रधान घरकुल आवास योजनेअंतर्गत हिंगोली जिल्ह्यातल्या आखाडा बाळापूर ग्रामपंचायत अंतर्गत ९५० लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करण्यात आलं आहे. त्यापैकी ८०० लाभार्थ्यांना निधीचा पहिला हप्ता कळमनुरीचे आमदार संतोष बांगर तसंच तहसीलदार जीवककुमार कांबळे यांच्या हस्ते काल ऑनलाइन पद्धतीनं वितरित करण्यात आला.

****

छत्रपती संभाजीनगर इथं काल ज्येष्ठ संगीततज्ज्ञ पंडित विश्वनाथ ओक यांचा विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला. सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे सचिव डॉ श्रीरंग देशपांडे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. या सत्कार सोहळ्यानंतर प्रसिद्ध गायक विश्वनाथ दाशरथे यांनी ओक यांची प्रकट मुलाखत घेतली, त्यातून ओक यांचा सांगितिक प्रवास श्रोत्यांसमोर उलगडत गेला.

****

छत्रपती संभाजीनगर इथले इतिहास अभ्यासक रफत कुरेशी यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँण्ड कल्चरल हेरिटेज – इंटॅकच्या वतीने शहरात काल औरंगाबाद लेणी इथं हेरिटेज वॉक घेण्यात आला. यावेळी इतिहास तज्ज्ञ डॉ. दुलारी कुरेशी यांनी लेणीतलं शिल्पसौंदर्य आणि इतिहास याविषयी माहिती दिली. याअंतर्गत आजचा दुसरा हेरिटेज वॉक औरंगपुरा इथल्या श्री बाळकृष्ण महराज संमाधी मंदीरात होत आहे.

****

क्रिकेट

भारत–इंग्लंडदरम्यान लॉर्ड्सच्या मैदानावर सुरू असलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात काल तिसऱ्या दिवस अखेर इग्लंडनं दुस–या डावात बिनबाद दोन धावा करत, दोन धावांची आघाडी घेतली आहे. तत्पूर्वी भारताने आपल्या पहिल्या डावात सर्वबाद ३८७ धावा करत इंग्लंडच्या पहिल्या डावातल्या धावांचीच बरोबरी साधली होती. पाच सामन्यांच्या या मालिकेत दोन्ही संघ एक – एकनं बरोबरीत आहेत.

****

विम्बलडन टेनिस स्पर्धेत महिला एकेरीचं अजिंक्यपद पोलंडच्या इगा श्वियांतेक हिनं पटकावलं आहे. अंतिम लढतीत इगानं अमेरीकेच्या अमांडा अनिसिमोव्हा हिचा सहा – शून्य, सहा – शून्य असा पराभव केला.

पुरुष एकेरीत आज अव्वल मानांकित यानिक सिनर आणि द्वितीय मानांकित कार्लोस अल्काराझ यांच्यात अंतिम लढत होणार आहे.

****

महाराष्ट्र २०४७ चं व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी राज्यभरात नागरिक सर्वेक्षण राबवलं जाणार आहे. या सर्वेक्षणात सहभागासाठी देण्यात आलेल्या लिंकचा वापर करून नागरिकांनी आपली मतं आणि सूचना द्याव्यात, असं आवाहन छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केलं आहे. सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांनी यामध्ये सहभाग नोंदवावा, असंही जिल्हाधिकाऱ्यांनी म्हटलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी अवैध धंद्यांना प्रतिबंध करण्यासाठी विशेष पथक नेमलं आहे. हे पथक दारुची अवैध वाहतूक, दुचाकी चोरी, नशेच्या गोळ्यांसह अंमली पदार्थांची तस्करी आणि वापर आदी अवैध धंद्यांना आळा घालणार आहे.

****

हवामान

मध्य महाराष्ट्राचा घाट भाग तसंच मराठवाड्यात पुढच्या २४ तासांत अनेक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. विभागात ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा अंदाजही हवामान खात्यानं वर्तवला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथल्या जायकवाडी धरणातला पाणीसाठा ७५ टक्क्यांवर पोहोचला आहे.

****